**परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांची जर्मन भेट (22-24 मे 2025)**

24 मे 2025

परराष्ट्र व्यवहार मंत्री (EAM) डॉ.एस.जयशंकर यांनी 22–24 मे 2025 दरम्यान जर्मनीला भेट दिली. जर्मनीत नवीन सरकार स्थापनेच्या महिन्याभराच्या आत EAM यांनी दिलेल्या भेटीतून द्विपक्षीय संबंधाच्या बळकटीकरणासाठी उभय देशांचे प्राधान्य दिसून येते.

2. EAM यांनी चॅन्सेलर फ्रेडरिक मर्झ यांची भेट घेतली. तसेच समपदस्थ श्री. जोहान वडेफूल (परराष्ट्र मंत्री, जर्मनी) यांच्या सोबत चर्चा केली. श्रीमती. कॅथरीना रेचे (मंत्री, वित्तीय व्यवहार आणि उर्जा) आणि डॉ. गुंटर सॉटर (फेडरल चॅन्सेलर यांचे परराष्ट्र आणि सुरक्षा धोरण सल्लागार ) यांच्या सोबत देखील विस्तृत चर्चेत भाग घेतला. तसेच जर्मन संसद सदस्य, परराष्ट्र आणि सुरक्षा धोरण तज्ज्ञ आणि भारतीय समुदायाचे सदस्य यांच्यासोबत देखील त्यांनी संवाद साधला.

3. चॅन्सेलर मर्झ यांच्या सोबतच्या बैठकीदरम्यान, EAM यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जर्मनी मधील नवीन फेडरल सरकारला शुभेच्छा कळविल्या. विविध क्षेत्रांमध्ये वाढत्या बहुआयामी भारत-जर्मनी धोरणात्मक भागीदारीला अधिक बळकटी देण्यासाठी चॅन्सेलर मर्झ यांनी भक्कम पाठिंबा व्यक्त केला. दहशतवाद विरोधी लढाईत जर्मन सरकारच्या भारताप्रती दृढभाव आणि पाठिंब्याबद्दल भारताच्या वतीने परराष्ट्रमंत्र्यांनी आभार व्यक्त केले.

4. EAM यांनी परराष्ट्र मंत्री श्री. जोहान वडेफूल यांच्या सोबत द्विपक्षीय सहकार्य विषयक विस्ताराने चर्चा केली. संरक्षण, डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, हरित आणि शाश्वत विकास आणि प्रतिभा गतिशीलते सह प्रमुख धोरणात्मक क्षेत्रांमध्ये सहयोग वाढविण्यासाठी उभय बाजूंनी त्यांच्या सामायिक वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. प्रादेशिक तसेच जागतिक घडामोडींवर विचारांचे आदान-प्रदान केले. दहशतवादाशी सामना करणे, आंतरराष्ट्रीय कायद्यांचे जतन करणे आणि बहु- ध्रुवीय, नियम-आधारित आंतरराष्ट्रीय नियमांचे पालन करणे आदी विषयांवर विचार सामायिक केले. धोरणात्मक भागीदारीच्या 25 व्या वर्षपूर्तीच्या निमित्ताने मंत्र्यांनी अधिकृत लोगो देखील लॉंच केला.

5. EAM यांचे फेडरल चॅन्सेलर यांचे परराष्ट्र आणि सुरक्षा धोरण सल्लागार डॉ. गुंटर सॉटर यांच्याशी देखील चर्चा पार पडली. उभय बाजूंनी सायबर सुरक्षा, इंडो-पॅसिफिक आणि संरक्षण औद्योगिक सहकार्य या क्षेत्रांसह धोरणात्मक, संरक्षण आणि सुरक्षा सहकार्य मजबूत करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी केली.

6. EAM यांची श्रीमती. कॅथरिन रेचे (मंत्री- वित्तीय व्यवहार आणि उर्जा) यांच्यासोबत बैठक पार पडली. या बैठकीत भारत-जर्मनी आणि भारत-EU व्यापार आणि गुंतवणूक संबंध यावर विचारमंथन करण्यात आले.  उभय बाजूंनी ग्रीन हायड्रोजन आणि पायाभूत सुविधा क्षेत्र आणि रेल्वे या क्षेत्रासह ग्रीन आणि शाश्वत विकास भागीदारीतील प्रगती विषयी चर्चा केली.

7. EAM यांनी विविध राजकीय प्रवाहातील संसद सदस्यांसोबत देखील संवाद साधला.  या संवादांमध्ये राजकीय संवाद वाढवणे, आर्थिक आणि तांत्रिक सहकार्य मजबूत करणे आणि प्रमुख जागतिक आणि प्रादेशिक घडामोडींवर विचारांची देवाणघेवाण करणे यावर लक्ष केंद्रित केले गेले.

8. जागतिक सुरक्षा आणि स्थिरता वाढविण्यासाठी भारत-जर्मनी धोरणात्मक भागीदारीला चालना देण्यासाठी परराष्ट्र आणि सुरक्षा धोरणांवरील विचारवंत आणि तज्ज्ञांशी संवाद साधत, EAM हे DGAP (जर्मन कौन्सिल ऑन फॉरेन रिलेशन्स) मधील उच्च-स्तरीय विचारगट संवादात सहभागी झाले.

9. युरोपीय देशांमधील भारताच्या राजदूत/उच्चायुक्तांचा सहभाग असलेल्या प्रादेशिक HOM परिषदेचे अध्यक्षपदही EAM यांनी भूषवले.

10. उभय देश धोरणात्मक भागीदारीच्या 25 वर्ष पूर्तीचा टप्पा साजरा करत असताना EAM यांचा जर्मनी दौरा महत्त्वपूर्ण आहे.  यामुळे नव्याने गठित झालेल्या जर्मन सरकारशी संबंध पुन्हा सुरू झाले, ज्यामुळे भारत-जर्मनी धोरणात्मक भागीदारीला नवीन गती मिळाली आणि भारत आणि जर्मनीमधील राजकीय, आर्थिक, तांत्रिक आणि नागरिक परस्पर संबंध अधिक मजबूत करण्यासाठी दोन्ही बाजूंच्या वचनबद्धतेची पुष्टी झाली.  भारत-EU संबंधांची गती विस्तारण्यासाठी जर्मनीचं पाठबळ महत्वपूर्ण आहे. ज्यामध्ये FTA जलद पूर्ण करणे समाविष्ट आहे.

बर्लिन

24 मे 2025